आर.सी.सी क्र. ६४/२०१८
सरकार विरुध्द शेख युसूफ
**निशाणी क्र. ७०/ क**

**अभियोग पक्षा तर्फे साक्षीदार क्रमांक २ यांची जबानी–**

मी प्रतिज्ञापुर्वक शपथेवर निवेदन करतो की,

**माझे नाव – श्री. कलंदर खान अजीज खान पठाण,**

वय – ६० वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त सहायक फौजदार

निवासस्थान– न्यु अल्तमश कॉलनी, औरंगाबाद.

------------------------------------------------------------

**सरतपासणी अभियोग पक्षा करीता**

**श्री. द. रा. काठुळे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे तर्फे –**

१. दिनांक २२.०८.२०१५ रोजी माझी नेमणुक वाहतुक शाखा, औरंगाबाद येथे चालक म्हणून होती. त्या दिवशी आम्ही वाहन तपासणीचे काम महावीर चौक येथे करीत होतो. त्या दरम्यान आम्हाला एक अॅपे रिक्षा एम.एच.२० डी.सी–१५९८ आढळून आली. सदर वाहन तपासणी करतांना आम्ही त्या वाजनाच्या चालकाला गाडी संबंधी कागदपत्रांची विचारपुस केली असता, त्याचेकडे वाहनाचे कागदपत्रे नव्हती. त्यामुळे आम्ही सदरची गाडी जप्त करून विक्रम स्टेडीअम, पोलीस आयुक्त कार्यालय, औरंगाबाद येथे जमा केली. या व्यतिरीक्त मला या घटनेबाबत काही माहीती नाही. हे मला माहीत नाही की, सर्व आरोपींनी मिळून वर उल्लेखीत अॅपे रिक्षाचे बनावट कागदपत्रे तयार करून शासनाची फसवणूक केली होती.

**सरतपास पुर्ण.**

(साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्याने सरकारी अभियोक्ता यांनी उलटतपासाची परवानगी मागितली. परवानगी मंजुर)

**उलटतपासणी अभियोग पक्षा करीता**

**श्री. द. रा. काठुळे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे तर्फे –**

२. हे म्हणने खरे आहे की, पेट्रोलिंग करण्यासाठी आमच्या सोबत पो.कॉ– श्री. बाशिद, पो.कॉ. ढगे श्री. मतलबे– पो.कॉ व श्री. बोगांने–पोलीस कॉन्स्टेबल हजर होते. हे म्हणने खरे आहे की,

**निशाणी क्र. ७०/ क**

माझ्या समक्ष अॅपे रिक्षा एम.एच.२० डी.सी–१५९८ या वाहनाच्या कागदपत्रांची पडताळणी केली असता आम्हाला असे दिसून आले की, त्या वाहनाचे परमीट हे ग्रामीण परमीट होते. हे म्हणने खरे आहे की, दिनांक २५.०८.२०१५ रोजी तपासा करीता मुळ परमीट धारक शेख युसूफ शेख असद याला पोलीस स्टेशनमध्ये बोलविण्यात आले होते. हे म्हणने खरे आहे की, चौकशीमध्ये असे आढळून आले की, शेख युसूफ याचेकडे केवळ वाहनाचे परमीट होते व त्या वाहनाचा बॅच नव्हता. हे म्हणने खरे आहे की, शेख युसूफ याची चौकशी तपासी अधिकारी यांनी केली. हे म्हणने खरे आहे की, शेख युसूफ यांनी असे सांगीतले की, शेख तनवीर शेख सलीमोद्दीया याचेकडे तो चालक म्हणून काम करतो व त्यांचेकडे जप्त अॅपे रिक्षाचे दोन परमीट होते, एक शहरी व एक ग्रामीण परमीट होते.

३. हे म्हणने खरे आहे की, शेख युसूफने असे सांगीतले की, एका व्यक्तीच्या नावाने एका गाडीचे दोन परमीट ठेवणे शक्य नाही त्यामुळे शेख तनवीर याने त्याला अॅपे रिक्षाचे ग्रामीण परमीट शेख युसूफच्या नावाने ट्रान्सफर करण्याकरीता दिले होते. हे म्हणने खरे आहे की, तपासी अधिकारी यांनी शेख तनवीर याला सुध्दा चौकशी करीता पोलीस स्टेशनला बोलविले होते. हे म्हणने खरे आहे की, शेख तनवीर याने मान्य केले होते की, त्याचेकडे अॅपे रिक्षाचे दोन परमिट होते, एक शहर व एक ग्रामीण परमीट. हे म्हणने खरे आहे की, शेख तनवीरने मान्य केले होते की, त्याने ग्रामीणचे परमीट शेख युसूफ याचेकडे दिले होते. हे मला माहीत नाही की, शेख तनवीर याने सांगीतले की, त्याने परमीट ट्रान्सफर करण्यासाठी शेख शमसोद्दीन उर्फ बाबाभाई याचेकडे पस्तीस हजार रुपयांसह दिले होते. हे मला माहीत नाही की, शेख तनवीर याने पुढे असे सांगीतले की, बाबाभाई याने ते परमीट शेख मुजम्मील शेख मुस्ताक याचेकडे ट्रान्सफर करण्यासाठी दिले.

४. हे म्हणने खरे आहे की, तपासादरम्यान शेख तनवीर याने सांगीतले की, बनावट कागदपत्रांच्या आधारे शेख मुजम्मील याने अॅपे रिक्षा एम.एच.२०–टी–२५१२ चे ग्रामीण परमीट शेख तनवीर याच्या नावावरून शेख युसुफ याच्या नावावर ट्रान्सफर करून अॅपे रिक्षा एम.एच.२०–ए.ए–६९२९ या गाडीवर ते परमीट नोंदविले. हे म्हणने खरे आहे की, त्यानंतर शेख तनवीर याने शेख युसूफ याच्या नावे पगारीया ऑटो येथे नवीन एल.पी.जी. रिक्षा खरेदी केली. हे म्हणने खरे आहे की,

रिक्षा क्र. एम.एच.–२०ए.ए–६९२९ वरून रिप्लेस केलेले रिप्लेसमेंट ऑर्डर पगारीया ऑटो येथील सेल्स एक्सीक्युटीव्ह रामदास वेव्हळ यांचेकडे सादर करून खरेदीचे आणि पासींगचे पैसे दिले. हे म्हणने खरे आहे की, त्यानंतर रामदास वेव्हळ याने जुन्या वाहनाचे कागदपत्रे त्यांचे प्रतिनिधी काझी एजाजोद्दीन याचेकडे दिले व त्याने आपे रिक्षा क्रमांक एम.एच–२०–डी.सी–१५९८ चे ग्रामीण परमीट शेख युसूफचे नावे करून दिले.

५. हे म्हणने खरे आहे की, या सर्व बाबी मी पोलीसांना जबाब देते वेळेस सांगीतल्या होत्या व त्या माझ्या जबाबात बरोबर नमुद आहेत. हे म्हणने खरे आहे की, माझ्या जबाबातील **अधोरेखांकित भाग–अ** मजकुर बरोबर आहे. मी आरोपी युसूफ व इतर आरोपी यांना ओळखतो. ते सर्व आज न्यायालयात हजर आहेत.

**उलटतपासणी आरोपी पक्ष क्र. १ व २ करीता श्री. एस. ए. झैदी, विधीज्ञ यांचे मार्फत–**

६. घटना दिनांक २२.०८.२०१५ रोजी घडली आहे. पोलीसांनी माझा जबाब दिनांक २५.०८.२०१५ रोजी नोंदविला. या तारखेनंतर पोलीसांनी माझा जबाब नोंदविलेला नाही. माझ्या जबाबावरील तारीख दिनांक २०.०७.२०१७ ही बरोबर नमुद आहे. दिनांक २०.०७.२०१७ रोजी पोलीसांनी माझा जबाब नोंदविला होता का हे मला आता आठवत नाही. हे मी नक्की सांगु शकत नाही की, दिनांक २५.०८.२०१५ रोजी पोलीसांनी माझा जबाब लेखी स्वरुपात घेतला होता का.

७. हे म्हणने खरे आहे की, मी चालक आहे त्यामुळे कुठल्या प्रकरणात काय चौकशी करण्यात येते, याची मला माहीती नाही. हे म्हणने खरे आहे की, शेख युसूफ व शेख तनवीर यांना कुठल्या तारखेला पोलीस स्टेशनमध्ये बोलविण्यात आले होते व कोणी बोलविले होते, हे मला माहीत नाही. हे म्हणने खरे आहे की, त्यांचा जबाब माझ्या समक्ष नोंदविण्यात आला नाही. मी स्वतः आरोपींकडे काही विचारपुस केली नाही. हे म्हणने खरे आहे की, आरोपींनी केलेल्या कथनाबाबत मला प्रत्यक्ष कुठलीच माहीती नाही. हे म्हणने खरे नाही की, तपासीक अधिकारी यांनी माझा जबाब माझ्या सांगण्यानुसार नोंदविला नाही. हे म्हणने खरे नाही की, मी न्यायालयासमक्ष खोटा सरतपास दिला आहे.

**निशाणी क्र. ७०/ क**

**उलटतपासणी आरोपी पक्ष क्र. ३ व ४ करीता श्री. आदील बियाबणी, विधीज्ञ यांचे मार्फत–**

८.      कुठल्याही गाडीचे परमीट चढविण्याचे व काढुन टाकण्याची प्रक्रिया मला माहीत नाही. हे म्हणने खरे आहे की, कुठलेही परमीट चढवितांना व काढुन टाकतांना आवश्यक कागदपत्रांची तपासणी करण्याचे काम आर.टी.ओ कार्यालयाचे आहे. हे म्हणने खरे आहे की, संपुर्ण प्रक्रिया राबविल्यानंतरच परमीट चढविण्यात किंवा काढुन टाकण्यात येते. हे म्हणने खरे आहे की, परमीट वैध असल्याच्या कालावधीत ते एका वाहनावरून काढुन दुस–या वाहनावर चढविण्याचा निर्णय परमीट धारकाचा असतो. हे म्हणने खरे आहे की, सदर सर्व प्रक्रियेत ति–हाईत व्यक्तीचा हस्तक्षेप नसतो. हे म्हणने खरे नाही की, आरोपींनी संगणमत करून शासनाची फसवणूक केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणने खरे नाही की, आरोपींना ओळखत असल्याचे मी खोटे सांगत आहे.

**उलटतपासणी आरोपी पक्ष क्र. ५ करीता श्री. सुरडकर व्ही.सी., विधीज्ञ यांचे मार्फत–**
**यांनी उपरोक्त आरोपी क्र. १ ते ४ यांचा उलटतपास जशास तसा स्वीकारला.**

**उलटतपासणी आरोपी पक्ष क्र. ६ करीता श्री. शेख अनिस, विधीज्ञ यांचे मार्फत–**
**यांनी उपरोक्त आरोपी क्र. १ ते ४ यांचा उलटतपास जशास तसा स्वीकारला.**

उलटतपास पुर्ण.

समक्ष

**–/स्वाक्षरीत/–**

( श्रीमती एम. एस. सहस्रबुध्दे )

मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद

दिनांक– २३/११/२०२३.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती.

**–/स्वाक्षरीत/–**

( श्रीमती एम. एस. सहस्रबुध्दे )

मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद